# Washim District Police

**Nature of Work** :- **Seizing Illegal Liquor**

**Police Station** :- **Malegaon**

**Date of Good Work done** :- **17/12/2022**

**Brief of the work done :-**

पो.स्टे.मालेगाव पोलिसांनी पकडली अवैध देशी दारू ; 85 हजारांचा मुद्देमाल जप्त.

## पोलिसांनी पकडली अवैध देशी दारू

देशोन्नती वृत्तसंकलन...

**मालेगांव** ■ मालेगाव पोलिसांनी मोठी कारवाई करत १६ डिसेंबर रोजी दुपारी ४ वाजेच्या सुमारास अमानी पांगरी नवघरे रोडवर सापळा रचून दोन आरोपींना ताब्यात घेऊन अवैध विक्रीसाठी नेण्यात येत असलेली ५७०० रुपये किंमतीची देशी दारू व ८०००० रुपये किमतीची स्कुटी जप्त केली आहे.

मालेगांव चे ठाणेदार किरण वानखेडे यांना पांगरी नवघरे येथे बेकायदेशीर विकण्यासाठी देशी दारू नेण्यात येत असल्याची गोपनीय माहिती खबऱ्या कडून मिळाली. मिळालेल्या माहितीनुसार ठाणेदार किरण वानखेडे , पोलिस उपनिरीक्षक राहुल गंधे ,पोलिस हेड कॉन्स्टेबल गजानन झगरे, गणेश बियाणी , पोलिस कॉन्स्टेबल समाधान वाघ , चालक पोलिस कॉन्स्टेबल , किशोर नवलकर यांनी दोन पंचासह अमानी पांगरी नवघरे रस्त्यावर सापळा रचून आरोपी गणेश भिंगारवाले रा.पांगरी नवघरे याच्याकडून ९० मिली देशी दारूच्या २५ बाटल्या किंमत १५०० रुपये आणि आरोपी विठ्ठल खोलगडे रा.वाशिम याच्याकडून ९० मिली देशी दारूच्या ७० बाटल्या किंमत ४२०० रुपये व एक स्कूटी किंमत



८०००० रुपये, असा एकूण ८५७०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

दोन्ही आरोपींना ताब्यात घेऊन जप्त केलेल्या मालासह मालेगाव पोलीस ठाण्यात आणण्यात आले आहे. पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. (श.प्र.)